## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- १३४७/२०१८/नाशिक**

१ श्री. विजयकुमार बळीराम बरोसनी, : अपिलार्थी
रा. सी/६, शांतीनगर, निफाड,
ता. निफाड, जि. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादीf
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, निफाड,
ता. निफाड, जि. नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, निफाड,
ता. निफाड, जि. नाशिक.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक ०८/०७/२०२०**

अपिलार्थी यांनी दिनांक २२/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०८/०७/२०२० रोजी meet.google.com/fmt-kkcw-izd या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होत्या.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २७/१२/२०१७ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती पुरविली नाही. म्हणुन जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही व्हावी, सबब, प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७/१२/२०१७ माहिती अर्जान्वये "विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड

क्र.मशा/कार्या/२/जमिन/प्र.क्र.१७३१/२०१७/जा.क्र.२८३ नाशिकरोड दिनांक ०३/११/२०१७ पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती" मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर न पुरविल्याने अपिलार्थी यांनी दिनांक २०/०३/२०१८ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २०/०३/२०१८ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६/०४/२०१८ रोजी सुनावणी नियोजित केली. मात्र सदर दिवशी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

सुनावणीदरम्यान युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २७/१२/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत अथवा त्यानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २०/०३/२०१८ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) मधील नमुद तरतुदींचा भंग करणारी आहे. म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक केंमाआ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/३/२००८ नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये, याबाबत लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तरी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार श्री. हेमंत गुरव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७/१२/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जमाबंदी अव्वल कारकून, श्री. प्रकाश धर्माधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २७/१२/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले नाही. म्हणून श्री. धर्माधिकारी यांचेविरुध्द त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे तात्काळ सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, श्रीमती संघमित्रा बाविस्कर यांच्या अपिलार्थी यांनी दिनांक २०/०३/२०१८ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक केंमाअ-२००७/७४/ प्र.क्र.१५४/ ०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे तात्काळ सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शासन परिपत्रक दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

४) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १३४७/२०१८/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(के. एल. बिश्नोई)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

१. श्री. प्रकाश धर्माधिकारी (सेवानिवृत्त),
(तत्कालीन जन माहिती अधिकारी),
जमाबंदी अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय, निफाड,
ता. निफाड, जि. नाशिक.

२. श्रीमती संघमित्रा बाविस्कर,
(तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी),
(प्रशासन नायब तहसिलदार),
तहसिल कार्यालय, दिंडोरी,
ता. दिंडोरी, जि. नाशिक.

---

प्रत,

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, ता. जि. नाशिक.

यांना उपरोक्त आदेशानुसार संबंधित अधिकारी यांचेकडून खुलासा आयोगास सादर करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्याकरिता उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक